गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २०५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगद्धर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अफवांचा बाजार अन् जालनेकरांची इंधनासाठी धावाधाव; काही ठिकाणी तात्पुरता तुटवडा

**जालना । प्रतिनिधी -** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात एलपीजी गॅस व इंधन टंचाई निर्माण झाल्याची अफवा सोशल मीडियावर वेगाने पसरल्याने शहरासह जिल्हाभरात नागरिकांची पेट्रोल पंपांवर अक्षरशः झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या अफवांमुळे अनेकांनी वाहनांमध्ये अतिरिक्त इंधन साठवण्याचा प्रयत्न केल्याने काही पेट्रोल पंपांवर तात्पुरता तुटवडा निर्माण झाल्याचेही समोर आले आहे.

शहरातील प्रमुख चौकांमधील पेट्रोल पंपांवर सकाळपासूनच लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दुचाकी, चारचाकी वाहनांसह काही नागरिकांनी ड्रम, कॅनमध्येही पेट्रोल-डिझेल साठवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. त्यामुळे वाहतूक कोंडीचीही समस्या निर्माण झाली होती.

दरम्यान, या परिस्थितीबाबत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्पष्ट करत सांगितले की, जिल्ह्यात एलपीजी गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे. काही पेट्रोल पंप चालकांकडून तेल कंपन्यांना देयके उशिरा अदा झाल्यामुळे इंधन पुरवठ्यात किरकोळ विलंब झाला होता. मात्र, त्याचा चुकीचा अर्थ लावत टंचाईच्या अफवा पसरवण्यात आल्या.

तज्ञांच्या मते, प्रत्यक्षात इंधनाची कमतरता नसतानाही अफवांमुळे नागरिक मोठ्या प्रमाणात साठेबाजी करू लागतात आणि त्यामुळेच कृत्रिम तुटवडा निर्माण होतो. जालना शहरातही याच प्रकारामुळे काही पेट्रोल पंप काही काळासाठी कोरडे पडल्याचे दिसून आले.

सोशल मीडियावर चुकीची माहिती पसरवून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. तसेच नागरिकांनी कोणतीही अप्रमाणित माहिती पुढे पाठवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

नवीन आदेशानुसार, दुचाकी वाहनांसाठी जास्तीत जास्त २०० रुपयांपर्यंतच इंधन देण्यात येणार असून, तीनचाकी व चारचाकी वाहनांसाठी ही मर्यादा २००० रुपये निश्चित करण्यात आली आहे. तसेच कॅन, बाटल्या किंवा ड्रममध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

प्रशासनाने नागरिकांना अनावश्यक गर्दी टाळून केवळ आवश्यकतेनुसारच इंधन घेण्याचे आवाहन केले आहे. रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. याशिवाय, प्रत्येक पेट्रोल पंपावर दररोज उपलब्ध साठा, प्राप्त साठा व मागणी केलेला साठा याची माहिती दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व पेट्रोल पंप चालकांनी या आदेशाचे काटेकोर पालन करणे आवश्यक असून, उल्लंघन करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.



## इंधन मुबलक प्रमाणात उपलबध; नागरिकांनी आफवांवर विश्वास ठेवू नये

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जालना जिल्ह्यात एलपीजी गॅस व इंधन टंचाई निर्माण झाल्याची अफवा पसरली असून, यामुळे जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठ्या प्रमाणत गर्दी करत आहेत. मात्र, जिल्ह्यात एलपीजी गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू आहे. अलीकडे काही ठिकाणी गॅस व इंधन टंचाईबाबत चूकीच्या अफवा पसरत असल्याने, नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होत आहे. मात्र, जिल्हा प्रशासनाने या अफवांचे खंडन करत, परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, जिल्ह्यातील काही पेट्रोल पंप चालकांनी गॅस व तेल कंपन्यांना देयके उशिरा अदा केल्याने त्यांना इंधन साठा मिळण्यास थोडा विलंब झाला होता. याचा चुकीचा अर्थ काढून शहरात आणि जिल्ह्यात एलपीजी गॅस व इंधन संपल्याच्या चूकीच्या अफवा पसरल्यामुळे अनेक नागरिक वाहनांमध्ये अतिरिक्त साठा करण्यासाठी पेट्रोल पंपांवर गर्दी करत असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, सर्व तेल कंपन्यांचे विक्री अधिकारी आणि प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा भासणार नाही, याची जिल्हा प्रशासनाकडून पूर्ण काळजी घेतली जात आहे. सोशल मिडिया किंवा इतर माध्यमांतून एलपीजी गॅस व इंधन टंचाईबाबत चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध प्रशासनामार्फत कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासन आणि तेल कंपन्या इंधनाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कटिबद्ध आहेत. जिल्ह्यात घरगुती गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा पुरेसा पुरवठा सुरू असल्याने नागरिकांनी घाबरून न जाता शांतता आणि संयम राखावी. जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींकडे घरगुती एलपीजी गॅसचा पर्याप्त साठा उपलब्ध आहे. तसेच पेट्रोल पंपांवरही पेट्रोल आणि डिझेलचा नियमित पुरवठा सुरू असून, कोणतीही



कमतरता भासणार नाही यासाठी जिल्हा प्रशासनाकडून योग्य ते नियोजन करण्यात आले आहे. पुरवठा साखळी सुरळीतपणे कार्यरत असल्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊन साठेबाजी करू नये. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले आहे.

## युवा आदर्श
## राम स्पर्श...

राम पद स्पर्श होता
वाटेतल्या दगडाला
उध्दार होई क्षणांत
उश्शाप अहिल्लेला
रामाचे नाम कोरता
दगडाचा सेतू झाला
जिंकले युध्द रामाने
श्रेय दे बिभीषणाला
रामनाम आले मुखा
मृत्यू वेळी रावणाला
पश्चाताप होई अंती
शांतीलाभे दानवाला
दिल्या माते शब्दाला
राम जागे वचनाला
राज्य वैभव त्यागिले
भुलला न कांचनाला
स्पर्श रामाचा केवळ
रामत्व येई दगडाला
दगडी मना जाग रे
शरण जावे रामाला
राम नाम सत्य बोला
तोच अंती समयाला
जानकीवात रामतेल
तेज उजाळे समईला

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## धनगर आरक्षणासाठी मुंबईत उपोषणास बसलेल्या दीपक बोऱ्हाडेंच्या सासऱ्याची आत्महत्त्या

**जालना । प्रतिनिधी -** धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाच्या अंमलबजावण्यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले दीपक बोऱ्हाडे यांचे सासरे रामराव होळकर यांनी आत्महत्या केल्याची दुखद घटना घडली. दीपक बोऱ्हाडे यांच्या घरीच बुधवार (दि २५) रोजी दुपारी त्यांनी गळफास लाऊन जीवन संपवलं. ते ७८ वर्षाचे होते, त्यांच्या आत्महत्येमुळे कुटुंब आणि नातेवाईकांना धक्का बसला असून आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. दीपक बोऱ्हाडे हे गेल्या १० दिवसांपासून मुंबईमध्ये उपोषणाला बसले आहेत.

राज्यात एकीकडे मराठा आरक्षणाचा लढा तीव्रपणे सुरू असतांना दुसरीकडे ओबीसी बचाव आंदोलनासाठी धनगर समाजाच्या लक्ष्मण हाके आणि दीपक बोऱ्हाडे यांनीही उपोषण केले होते. जालन्यातील आंतरवालीत त्यांनी उपोषणाच्या माध्यमातून ओबीसीचं आरक्षण कमी होऊ ने देण्यासाठी आणि मराठा पान २ वर

### ऑपरेशन शोध उल्लेखनीय कामगिरी; मराठा महासंघाकडून पोलिसांचा गौरव

## महिला व मुलींच्या शोधामुळे नातेसंबंधांची विखुरलेली वीण पुन्हा एकदा घट्ट झाली- अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** समाजातील सुरक्षिततेचा कणा असलेल्या पोलीस दलाने आपल्या कर्तव्यदक्षतेची आणि संवेदनशीलतेची प्रचिती पुन्हा एकदा दिली आहे. जालना जिल्हा पोलीस दलाने राबवलेल्या 'ऑपरेशन शोध-३' या मोहिमेमुळे जिल्ह्यातील १०७ महिला आणि ८ मुलींच्या आयुष्यातील अंधार दूर झाला असून, त्यांच्या कुटुंबात पुन्हा आनंदाचे दीप प्रज्वलित झाले आहेत. या ऐतिहासिक आणि उल्लेखनीय कामगिरीबद्दल मराठा महासंघाच्यावतीने पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल व त्यांच्या संपूर्ण पथकाचा गौरव केला.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, संतोष कराळे, ॲड. शैलेश देशमुख, मंगेश मोरे यांनी या यशस्वी मोहिमेचे सारथ्य करणारे पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, सहाय्यक नोडल अधिकारी तथा पोलीस निरीक्षक श्री. रायतूवार, सहाय्यक नोडल अधिकारी तथा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, फौजदार गणेश शिंदे, मिसिंग सेलचे पोलीस अंमलदार किशोर पुंगळे, कर्मचारी पुष्पा खरटमल, पान २ वर

## आज भव्य श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा

### सांस्कृतिक दर्शन, झाँकी, भजन मंडळ, बँजो मुख्य आकर्षण

**जालना । प्रतिनिधी -** मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही सकल हिंदू समाज आणि श्रीरामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने जालना शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. २६ मार्च रोजी दुपारी ४ वाजता गांधी चमन येथून या मिरवणुकीचा शुभारंभ होणार असल्याची माहिती समितीच्यावतीने देण्यात आली आहे.

यंदाची शोभायात्रा अधिक भव्य आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेली असेल. यात प्रामुख्याने नांदेडचे प्रसिद्ध भजन मंडळ आणि भुसावळचा सुप्रसिद्ध बँजो, प्रभू श्रीराम आणि श्रीहनुमानाची मूर्ती, गोमाता झाँकी, पंच परिवर्तन झाँकी आणि श्रीराम-लक्ष्मण व शबरी भेट झाँकी, इंदोर येथील महिला भजन गायिका, शिवकालीन शस्त्र प्रात्यक्षिके, मल्लखांब, मल्लयुद्ध प्रदर्शन, लेझीम पथक, वारकरी पथक आणि आई भवानी सोंग, एल.ई.डी. वॉल सामाजिक झाँकी, हे या मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण असणार आहे.



गांधी चमन, मंमादेवी मंदिर, मुथा बिल्डिंग, महावीर चौक, मामा चौक, सिंधी बाजार, बालाजी गल्ली, शोला चौक, रुपचंद उस्ताद तालीम चौक, नरनारायण मंदिर बडी सडक असा शोभायात्रेचा मार्ग असून श्रीराम मंदिर येथे श्रीरामाची महाआरती आणि जयघोषाने शोभायात्रेचा समारोप होणार आहे.

मिरवणुकीत महिलांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी पोलीस प्रशासन, महानगरपालिका प्रशासन आणि महावितरणचे कर्मचारी पूर्णतः सहकार्य करत असून ते शोभायात्रेदरम्यान तैनात असतील.

जालना जिल्ह्यातील भाविकांनी शोभायात्रेत लाखोंच्या संख्येने सहभागी होऊन प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करावा, असे आवाहन सकल हिंदू समाज व श्रीरामनवमी शोभायात्रा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## राजभवनात भव्य शिवस्मारक साकारावे!

### संभाजी ब्रिगेडचे प्रदेश कोषाध्यक्ष संतोष गाजरे यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** विश्ववंद्यनीय, संपूर्ण जगाचे ऊर्जा स्त्रोत असलेले जगातील एकमेव आदर्श राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजभवन परिसरात भव्य शिवस्मारक साकारण्यात यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश कोषाध्यक्ष संतोष गाजरे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



मंगळवारी (ता.२४) जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात संतोष गाजरे पाटील यांनी म्हंटले आहे की, राजभवनात शिवस्मारक उभे रहावे ही सर्व भारतीयांची इच्छा आहे. परंतु त्यासाठी योग्य व सक्षम निर्णय घेतला जात नाही.स्मारकाबाबत संभाजी ब्रिगेडने वेळोवेळी पाठपुरावा केला असल्याचे त्यांनी सांगितले. विरोधी पक्षात असतांना भाजपा सत्तेत आल्यावर शिवस्मारक उभारणार असल्याचे आश्वासन संभाजी ब्रिगेडला दिले होते.आपल्या आश्वासनाला जनतेनी साथ व छत्रपतींनी आशीर्वाद दिले. सत्तेत आल्यावर शिवस्मारकासाठी योग्य ठिकाण राजभवन असतांनाही अरबी समुद्रात शिवस्मारकाचा घाट घातला. संभाजी ब्रिगेडने विरोध केल्यानंतरही प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या हस्ते भूमिपूजन उरकले . यात जनतेच्या करातून गोळा केलेला पैसा पाण्यात घातला.असे जळजळीत वास्तव संतोष गाजरे पाटील यांनी निदर्शनास आणून दिले.तथापि सुंदर वातावरण , पुरेशी व प्रशस्त जागा,वर्षभर पर्यटकांना उपलब्ध राहील अशा राजभवन परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य शिवस्मारक उभे करण्यास सरकारने तत्काळ मंजुरी देऊन काम सुरू करावे,नसता छत्रपती शिवरायांच्या सन्मानात संभाजी ब्रिगेडतर्फे मोठे आंदोलन केले जाईल.असा इशारा संतोष गाजरे पाटील यांच्यासह प्रदेश प्रवक्ते प्रा.सूदर्शन तारख,विभागीय कार्याध्यक्ष विजय वाढेकर,जिल्हाध्यक्ष कैलास खांडेभराड, दत्तात्रय कपाळे, गिन्यानदेव जगताप यांच्यासह पदाधीकानी यांनी दिला आहे.

**संपादकीय पान**

# भारत आनंदी का नाही?

जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक सर्व्हे केला जातो. संपत्ती, आरोग्या बरोबरच परस्परंवरील विश्वास, ऋणानुबंध, करुणा या निकषांच्या आधारावर हे सर्व्हेक्षण केले जाते. वरील निकषांचा विचार करून यावर्षीही या संस्थेने जगातील १४७ देशांचा सर्व्हे करून एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात या संस्थेने जगातील सर्वाधिक आनंदी देशांची यादी प्रसिद्ध केली. या यादीतील पहिल्या वीस देशांमध्ये युरोपातील देशांचे वर्चस्व आहे. गेल्या अनेक वर्षापासून युद्धाच्या आगीत होरपळणारा इस्राईल हा देश आनंदी देशांच्या यादीत आठव्या स्थानी आहे. सतत युद्धाच्या छायेत राहूनही इस्रायली नागरिक आनंदी आहेत. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग नऊव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४७ देशांच्या यादीत भारत ११६ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, आणि चीन हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, नेपाळ आणि चीन यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत इतकेच काय तर युद्धग्रस्त युक्रेन आणि पॅलेस्टाईन हे देशही भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत. आनंदी देशांच्या यादीत युक्रेन १११ व्या क्रमांकावर आहे तर पॅलेस्टाईन १०८ व्या क्रमांकावर आहे. जगातील गरीब, मागास आणि युद्धाच्या छायेत असणाऱ्या देशातील लोक आनंदी असताना भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग नऊव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावांचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि समानता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे समानता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारततही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## पान १ वरुन

### धनगर आरक्षणासाठी ...

समाजाला ओबीसीतून आरक्षण न देण्यासाठी उपोषण केले होते. त्यानंतर, आता धनगर समाजाला एसटी प्रवर्गातू आरक्षण देण्याची मागणी करत दीपक बोऱ्हाडे मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत.

दरम्यान, दीपक बोऱ्हाडे यांचे उपोषण सुरू असतानाचा त्यांच्या सासऱ्यांनी गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यामुळे, आता दीपक बोऱ्हाडे आपलं उपोषण संपवून जालन्याकडे येतील अशी माहिती आहे.

### महिला व मुलींच्या ...

रेणुका राठोड आणि या मोहिमेत प्रत्यक्ष सहभागी झालेले सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे मराठा महासंघाने मनापासून आभार मानले आहेत. अशा प्रकारच्या मोहिमांमुळे गुन्हेगारीला चाप बसण्यासोबतच सामाजिक स्वास्थ्य जपले जाते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आपल्या भावना व्यक्त करताना अरविंद देशमुख म्हणाले की,गेल्या अनेक वर्षांपासून बेपत्ता असलेल्या या महिला आणि मुलींचा शोध लागल्याने नातेसंबंधांची विखुरलेली वीण पुन्हा एकदा घट्ट झाली आहे. या मोहिमेमुळे कुणाला आपली मायेची आई परत मिळाली, तर कुणाला लाडकी बहीण भेटली. कुणाचे सौभाग्य (पत्नी) घराबाहेर पडल्यानंतर पुन्हा परतले, तर कुणाला आपली आजी, मावशी आणि आत्या पुन्हा दिसल्या. या माता-भगिनी जेव्हा आपल्या घरी परतल्या, तेव्हा त्यांच्या कुटुंबीयांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू आणि चेहऱ्यावरील समाधान कोणत्याही शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. आमचे हरवलेले विश्व पुन्हा उभे राहिले, अशी भावना अनेक बाधित कुटुंबांनी व्यक्त केली आणि हे पोलिसांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळेच शक्य झाले. पोलीस प्रशासनाने दाखवलेली ही संवेदनशीलता आणि चिकाटी खरोखरच कौतुकास्पद आहे. एका हतबल कुटुंबाला त्यांचा सदस्य परत मिळवून देणे हे पुण्याचे कार्य आहे. या मोहिमेमुळे सामान्य जनतेचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला असून, सुरक्षिततेची भावना वाढली आहे, असे अरविंद देशमुख म्हणाले.

# संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी प्रभु रामचंद्राचे आदर्श सर्वांनीच अंगीकारले पाहिजे

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.महाराष्ट्रात नवीन वर्ष ''गुढीपाडवा'' म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले.त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते. आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच.यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूराचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे. त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील.कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू राचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला,रूषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्राची धुंद गुंजतांना दिसते.तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.आज अयोध्येतील राम मंदिरमुळे ''मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम'' या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे. आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते.प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे. कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी, स्वार्थीवृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवली आहे.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न(गुंग)असतात.''मु मे राम बगल में छुरी'' अशा प्रकारची असुरी भावना आजच्या ९५ टक्के राजकीय पुढाऱ्यांत दिसून येते.कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी ''रक्तबीज'' राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवीलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे आदर्श दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल.जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे.तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल.रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल.कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# भारतीय सशस्त्र दलात अधिकारी होण्याची सुवर्णसंधी

## नाशिक येथे १० दिवसांचे मोफत पूर्व प्रशिक्षण

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलात अधिकारी पदावर भरती होऊन देशसेवेचे स्वप्न पाहणाऱ्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनाने प्रशिक्षणाचे द्वार खुले केले आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र येथे दि.४ मे ते १३ मे २०२६ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६५ चे आयोजन करण्यात आले आहे. तरी यासाठी जालना जिल्ह्यातील पात्र उमेदवारांच्या मुलाखती दि.२४ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींना १० दिवसांच्या या कोर्समध्ये तज्ज्ञांमार्फत सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड परीक्षेची सखोल पूर्वतयारी करून घेतली जाईल. विशेष म्हणजे प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय शासनातर्फे करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील इच्छूक उमेदवारांनी दि.२४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहायचे आहे. उमेदवारांनी येताना सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्या संकेतस्थळावरून एसएसबी-६५ कोर्सचे प्रवेशपत्र आणि परिशिष्टांची प्रिंट पूर्ण भरून सोबत आणणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांच्या ०२५३-२४५१०३२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ९१५६०७३३०६ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी केले आहे.

# जिल्ह्यात डिजिटल जनगणनेचा बिगुल

## हलगर्जीपणा केल्यास कठोर कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात आगामी 'जनगणना २०२७' च्या पूर्वतयारीला वेग आला असून पहिल्या टप्प्यातील घर सूचीकरण आणि गृहनिर्माण गणनेचे काम लवकरच सुरू होणार आहे. जनगणना हे राष्ट्रीय महत्त्वाचे काम आहे. यात कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही. तरी कामात कसूर करणाऱ्यांवर जनगणना अधिनियम १९४८ व १९९० मधील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली आहे.

दि.२४ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या महत्त्वपूर्ण व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकीत जनगणनेच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपाची असल्याने त्यात पारदर्शकता आणि अचूकतेवर भर देण्यात आला आहे. जिल्ह्यातील क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल भवन येथे आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण ६ ते ८ एप्रिल आणि ९ ते ११ एप्रिल २०२६ या दोन टप्प्यांत पार पडणार आहे. सर्व नियुक्त कर्मचारी, पर्यवेक्षक आणि प्रगणक यांची नोंदणी .... पोर्टलवर करणे बंधनकारक आहे. एकदा नोंदणी झाल्यानंतर जनगणनेचे काम पूर्ण होईपर्यंत त्यात कोणताही बदल करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांचे मोबाईल क्रमांक, ई-मेल आणि पॅन कार्ड क्रमांक अत्यंत अचूक असणे आवश्यक आहे. संपूर्ण प्रणाली ओटीपी आधारित असल्याने माहितीतील छोटीशी चूकही प्रक्रियेत अडथळा ठरू शकते.

# रामनवमी ; लोकशाही आणि सहजीवनाच्या मूल्यांचा उत्सव

आज पवित्र रामनवमी निमित्ताने आपण प्रभू श्रीरामांच्या जीवनातील आदर्श, मर्यादा आणि न्यायनिष्ठेची आठवण करत हा विचार मांडत आहोत की, सण-उत्सव हे केवळ धार्मिक विधी नसून समाजाला दिशा देणारे मूल्यसंस्कार आहेत. श्रीरामांचे व्यक्तिमत्त्व हे केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून आदर्श राज्यकारभार, नैतिकता, समता आणि सर्वसमावेशकतेचे द्योतक आहे. म्हणूनच रामनवमी हा सण ''लोकशाही आणि सहजीवनाच्या मूल्यांचा उत्सव'' म्हणून पाहणे अधिक योग्य ठरते.



भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहेभिन्न धर्म, भाषा, संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली यांचा सुंदर संगम येथे आढळतो. अशा परिस्थितीत सहजीवन ही केवळ एक संकल्पना नसून ती सामाजिक गरज आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला आपली श्रद्धा आणि परंपरा जपण्याचा अधिकार आहे, परंतु त्या अधिकाराचा वापर करताना इतरांच्या अधिकारांचा आदर करणे हीच खरी लोकशाहीची कसोटी ठरते. श्रीरामांच्या जीवनातूनही आपल्याला हेच शिकायला मिळते की, ''स्वतःच्या कर्तव्याबरोबरच समाजाच्या हिताचा विचार करणे'' हे सर्वोच्च मूल्य आहे.

रामराज्य ही संकल्पना आजही आदर्श मानली जाते. त्या राज्यात न्याय, समता, सुरक्षितता आणि लोककल्याण यांना सर्वोच्च प्राधान्य होते. कोणत्याही प्रकारचा भेदभाव नव्हता आणि प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार होता. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही हेच तत्त्व लागू होते. म्हणूनच रामनवमीच्या निमित्ताने आपण केवळ धार्मिक उत्साहात रमून न जाता, त्या आदर्शांना आपल्या दैनंदिन जीवनात कसे उतरवता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे.

सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे प्रभावी माध्यम आहेत. परंतु अलीकडच्या काळात काही ठिकाणी सणांच्या नावाखाली अतिरेकी प्रदर्शन, ध्वनीप्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास किंवा सामाजिक तणाव निर्माण होण्याच्या घटना दिसून येतात. ही बाब चिंताजनक आहे. कारण सणांचा उद्देश आनंद, शांतता आणि एकात्मता वाढवणे हा असतो; विभाजन निर्माण करणे नव्हे. त्यामुळे रामनवमीसारख्या पवित्र सणाकडे ''सहजीवनाचा उत्सव'' म्हणून पाहणे ही काळाची गरज आहे.

सहजीवन म्हणजे एकमेकांच्या अस्तित्वाचा स्वीकार आणि आदर. विविध धर्मांचे, विविध विचारांचे लोक एकत्र शांततेने राहू शकतात, हीच भारताची खरी ओळख आहे. रामनवमीच्या निमित्ताने जर आपण इतर धर्मीय बांधवांना शुभेच्छा दिल्या, त्यांच्या भावनांचा आदर केला आणि सामाजिक सलोखा जपण्याचा प्रयत्न केला, तर हा सण अधिक अर्थपूर्ण ठरेल.

त्याचबरोबर, सण साजरे करताना काय करावे आणि काय टाळावे याची जाणीव असणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी नियमांचे पालन करणे, ध्वनीमर्यादा पाळणे, पर्यावरणपूरक पद्धती वापरणे, आणि कोणत्याही प्रकारच्या द्वेषपूर्ण किंवा भडकवणाऱ्या कृतींपासून दूर राहणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. सण हे आनंदाचे प्रतीक असले पाहिजेतइतरांसाठी त्रासदायक नव्हे.

आजच्या युगात सोशल मीडियाचा प्रभाव प्रचंड वाढला आहे. त्यामुळे सणांच्या काळात चुकीची माहिती, अफवा किंवा द्वेषपूर्ण संदेश पसरवले जाण्याचा धोका अधिक असतो. अशा गोष्टींपासून दूर राहणे आणि जबाबदारीने वागणे हीसुद्धा सहजीवनाचीच एक महत्त्वाची बाजू आहे.

शेवटी, रामनवमी हा केवळ एक धार्मिक सण म्हणून न पाहता, तो ''लोकशाही मूल्ये, समता, सहजीवन आणि मानवतेचा उत्सव'' म्हणून साजरा करणे हीच खरी श्रीरामांना अभिवादन ठरेल. ''माझा धर्म श्रेष्ठ'' या संकुचित विचाराऐवजी ''सर्व धर्मांचा सन्मान'' हा व्यापक दृष्टिकोन स्वीकारल्यासच समाजात खरी शांतता आणि प्रगती साध्य होईल. आपण सर्वांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजेआपण विविध धर्मांचे अनुयायी असलो तरी आपण सर्वप्रथम भारताचे जबाबदार नागरिक आहोत. म्हणूनच प्रत्येक सण हा ''एकतेचा आणि सहअस्तित्वाचा संदेश देणारा उत्सव'' बनला पाहिजे. रामनवमीच्या या शुभप्रसंगी आपण सर्वांनी लोकशाही आणि सहजीवनाच्या मूल्यांना अधिक दृढ करण्याचा संकल्प करूया.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## जालना शहरात वायू गुणवत्ता निर्देशांक मोजणी यंत्र बसवण्याची राहुल करनाडे यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक हवामान दिनानिमित्त जालना शहरातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर वायू गुणवत्ता निर्देशांक वायु प्रदूषण मोजण्यासाठी यंत्रे बसवण्याची मागणी जोर धरत आहे.

सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ५० नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात जालना परिसरातील उद्योग तसेच शहरातील वाढती वाहतूक यामुळे वायू प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. नागरिकांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होत असून श्वसनाचे आजार व इतर समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे नमूद करण्यात आले. देशातील दिल्ली,मुंबई ,पुणे यांसारख्या शहरांमध्ये वायू गुणवत्ता निर्दे शांक मोजणी यंत्रे बसवून नागरिकांना तत्काळ माहिती दिली जाते. मात्र जालना शहरात अशी सुविधा अपुरी असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. निवेदनामध्ये जालना एम आय. डी.सी परिसर तसेच शहरातील प्रमुख ठिकाणी वायू गुणवत्ता मोजणी यंत्रे बसवणे, प्रदूषण नियंत्रणासाठी कडक कारवाई करणे व नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे या मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संबंधित सर्व विभागांना पत्रव्यवहार करून तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. जर लवकरात लवकर कार्यवाही झाली नाही तर नागरिक लोकशाही मार्गाने आंदोलन छेडतील, असा इशाराही देण्यात आला. याप्रसंगी राहुल



सत्यनारायणजी करनाडे, अशोक चांदोडे, धरम गरंडवाल, सय्यद स्माईल, शेख फेरोज , शेख सिद्धिक, उमेशसिंह राजपूत, अर्जुनसिंह राजपूत, अमोल भक्कड, दीपक डोंगरे, भारत भगुरे, विनोद बिरसोने, अनिल सूर्यनारायण, विजय भगत, भरताना भक्त , सुभाष पिंपळे, संजय इमले, अशोक पिंपळे, सुनील कटारिया, कैलास पाटील पृथ्वीराजसिंग राजपूत, संजय चोपडे आदींचे उपस्थिती व पाठिंबा होता.

# जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक आज अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षेत संपन्न झाली. यावेळी बैठकीस जिल्हा रुग्णालयाचे डॉ. पी. एम. कुलकर्णी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे संजय ताकवाले, कृषी अधीकारी सचिन पांचाळ, समाज कल्याण विभागाचे एल.बी. बारगिरे सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासनचे जीवन जाधव, नायब तहसिलदार शैलेश राजमाने, पोलीस निरिक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन इंगेवाड यांची उपस्थिती होती.

जिल्हास्तरीय बैठकीत अमंली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या माध्यमातून विविध विभागांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश देत अपर जिल्हाधिकारी श्री. मिसाळ म्हणाले की, अवैध पद्धतीने गावठी दारू व अमली पदार्थांची निर्मिती व विक्री रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच महसूल विभागाने पोलीस कारवाई दरम्यान आवश्यक ती मदत करावी, असेही सांगण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाला ग्रामीण भागातील वैद्यकीय दुकाने व दवाखान्यांवर नियमित तपासणी करून औषधांचा गैरवापर रोखण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः 'एच वन' (१) गटातील औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर



कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित दुकाने व डॉक्टरांचे परवाने रद्द करण्याबाबतही सूचना अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी दिल्या.

शिक्षण विभागाने शाळा व महाविद्यालयांमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती मोहीम राबवावी, विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करावी, असे सांगण्यात आले. यासोबतच क्रीडा, आरोग्य व पोलीस विभागांनी संयुक्तपणे समुपदेशन व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवण्यात आले. जिल्ह्यातील नागरिकांनीही संशयास्पद हालचालींची माहिती प्रशासनाला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

# भुमाफियांचा कहर; कठोर कारवाईची मागणी

### दिनेश तिलवारे यांचे महसूल मंत्र्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात भुमाफियांचा वाढता प्रभाव आणि त्यांच्या कथित गैरकृत्यांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकरणी तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी गौरक्षक व हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते दिनेश तिलवारे यांनी केली आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पारस नंद, भैय्यालाल नंद, मनीष नंद व संतोष आर्य तसेच त्यांच्या सहकाऱ्यांकडून संगनमताने बोगस कागदपत्रांची निर्मिती करून जमिनी बळकावण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित व्यक्ती आर्थिक फायद्यासाठी देवस्थानांच्या, व्यापाऱ्यांच्या तसेच खासगी मालमत्तांवर डोळा ठेवून ती हडपण्याचा प्रयत्न करत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः शहरातील श्री गौरक्षण पांजरापोळ संस्थेच्या जमिनीवर बेकायदेशीर ताबा मिळवून त्याठिकाणी भाडेकरू ठेवून उत्पन्न घेतले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात विविध पोलीस ठाण्यांमध्ये तक्रारी दाखल असूनही अद्याप ठोस कारवाई झालेली नाही, अशी खंतही व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच, या प्रकरणात आवाज उठवणाऱ्यांना धमकावण्यासाठी गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा वापर केला जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, कोणीही उघडपणे विरोध करण्यास धजावत नसल्याचे तिलवारे यांनी म्हटले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच त्यांच्या ताब्यातील जमिनी त्वरित मुक्त करून त्या संबंधित मूळ मालकांना किंवा संस्थांना परत द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या निवेदनाच्या प्रती पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच चंदनझिरा, सदर बाजार आणि कदीम जालना पोलीस ठाण्यांच्या निरीक्षकांना देण्यात आल्या असून, लवकरात लवकर योग्य ती कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## अंकुशराव टोपे महाविद्यालयात अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांची सदिच्छा भेट



**जालना । प्रतिनिधी -** अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे अप्पर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांनी महाविद्यालयातील क्रीडांगण, वॉटर टँक, मेडिटेशन हॉल तसेच ग्रंथालय परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या परिसरात फिरताना त्यांनी येथील शैक्षणिक वातावरण, उपलब्ध सुविधा व अभ्यासक्रमांविषयी माहिती घेतली. महाविद्यालयातील प्रगती व व्यवस्थापनाबद्दल त्यांनी समाधान व आनंद व्यक्त केला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भुजंगराव डावकर, डॉ. शंकर तिकांडे तसेच ग्रंथालयातील ज्ञानेश्वर वाजे, कुणाल शिंदे, बबन भुसारे व महादेव बर्डे उपस्थित होते.






**जुना जालना येथील भगवान श्री राम मंदिरात राम नवमी निमित्त भव्य अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. भागवताचार्य रामदास महाराज आचार्य रामायण भागवत सांगताना सदगुरु भक्त कथा ऐकताना दिसून येत आहे. (छाया- जावेद तंबोली)**

# चार वर्षीय बालिकेवरील बलात्कार प्रकरण; सर्वोच्च न्यायालयाकडून पोलिसांची तीव्र कानउघाडणी

गुरुग्राम येथील चार वर्षीय बालिकेवरील बलात्कार प्रकरणाच्या तपासात अडथळे आणल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने आज हरियाणा पोलिसांवर अत्यंत कठोर शब्दात ताशेरे ओढले आहेत. न्यायालयाने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एका विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. पोलिसांवर आरोपींना वाचवण्याचा आणि गुन्ह्याची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर ठपका न्यायालयाने ठेवला आहे. बाल लैंगिक अत्याचार संरक्षण (पॉक्सो) कायद्याच्या कलम ६ अंतर्गत तीव्र लैंगिक अत्याचार या गंभीर गुन्ह्याचे प्रथमदर्शनी पुरावे असतानाही, पोलिसांनी केवळ कलम १० अंतर्गत लैंगिक छेडछाड या सौम्य गुन्ह्याची नोंद केली होती, असे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, ''हे एक असे प्रकरण आहे जिथे पोलिसांनी आरोपीला वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत.'' ''पोलीस आयुक्तपासून ते उपनिरीक्षकापर्यंत संपूर्ण पोलीस दलाने, पीडित बालिकेडे कोणताही पुरावा नाही किंवा तिच्या पालकांचे म्हणणे निरर्थक आहे, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

अभिलेखांवरून हे स्पष्ट होते की, पॉक्सो कायद्याच्या कलम ६ अन्वये गुन्हा घडला होता, परंतु पोलिसांनी अज्ञात कारणास्तव गुन्ह्याची नोंद कलम १० अंतर्गत करून त्याची तीव्रता कमी केली.''

या प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन, न्यायालयाने हरियाणा पोलीस दलातील वरिष्ठ महिला आयपीएस अधिकारी नाझनीन भासीन यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना करण्याचे निर्देश दिले. तसेच, गुरुग्रामचे पोलीस आयुक्त आणि सध्याच्या तपास अधिकाऱ्याला तपासापासून तात्काळ दूर करण्याचे आदेश दिले आहेत. कर्तव्यात कसूर केल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई का केली जाऊ नये, अशी कारणे दाखवा नोटीसही न्यायालयाने बजावली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर पीडित बालिकेच्या पालकांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. हरियाणा पोलिसांचा तपास असमाधानकारक असल्याने हे प्रकरण केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) किंवा विशेष तपास पथकाकडे सोपवण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती. न्यायालयाने बाल कल्याण समितीच्या सदस्यांनाही त्यांच्या असंवेदनशील वृत्तीबद्दल फटकारले आणि त्यांच्या शैक्षणिक पात्रतेवर गंभीर शंका उपस्थित केली.

या निकालावर आपली प्रतिक्रिया देताना ॲड. महेश एस. धन्नावत, ''सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय पीडितांच्या हक्कांसाठी एक मैलाचा दगड आहे. पोलिसांचे कर्तव्य हे निःपक्षपातीपणे तपास करणे आहे, आरोपींना पाठीशी घालणे किंवा गुन्ह्याची तीव्रता कमी करणे नाही. या निकालाने देशभरातील पोलीस दलांना एक सक्त संदेश दिला आहे. केवळ हरियाणा पोलीसच नव्हे, तर जालना पोलिसांनीही यातून बोध घ्यावा आणि पीडितांच्या बाबतीत अधिक संवेदनशीलतेने आणि कायद्याचे काटेकोर पालन करून तपास करावा. न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे न्यायव्यवस्थेवरील सामान्य माणसाचा विश्वास अधिक दृढ होईल.''

या प्रकरणातील सुनावणीदरम्यान न्यायालयाने पीडित बालिकेला आणि तिच्या कुटुंबाला तपास प्रक्रियेदरम्यान झालेल्या मानसिक त्रासाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. ''गुरुग्राम पोलिसांच्या असंवेदनशील, बेजबाबदार आणि पूर्णपणे बेकायदेशीर तपास पद्धतीमुळे पीडित बालिकेचा मानसिक छळ अनेक पटींनी वाढला,'' असे न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नोंदवले. या प्रकरणाने पुन्हा एकदा लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये पोलीस आणि इतर यंत्रणांच्या संवेदनशीलतेचा आणि कार्यपद्धतीचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

# महावीर जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील कत्तलखाने बंद ठेवण्याची मागणी

## श्री भगवान महावीर जन्मकल्याणक सेवा समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना | प्रतिनिधी -** अहिंसेचे दूत भगवान महावीर यांच्या आगामी जन्म कल्याणक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने एक दिवसासाठी बंद ठेवण्यात यावेत, या मागणीचे निवेदन आज बुधवार दि. २५ मार्च रोजी सकल जैन समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना देण्यात आले.

यासंदर्भात सकल जैन समाजाचे अध्यक्ष महावीर रुणवाल, कार्याध्यक्ष संजय लव्हाडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, येत्या मंगळवारी, ३१ मार्च रोजी संपूर्ण विश्वभरात भगवान महावीर यांचे जन्म कल्याणक मोठ्या उत्साहात साजरे केले जाणार आहे. भगवान महावीर यांनी जगाला ''जिओ और जिने दो'' (जगा आणि जगू द्या) हा शांतता व अहिंसेचा महान संदेश दिला. त्यांच्या या शिकवणीचा आदर राखत आणि जैन बांधवांच्या भावना लक्षात घेता, जन्मकल्याणच्या दिवशी जिल्ह्यातील मांस



विक्री व कत्तलखाने पूर्णपणे बंद ठेवावेत, अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदन देताना सकल जैन समाजाचे अध्यक्ष महावीर रुणवाल, कार्याध्यक्ष संजय लव्हाडे, उपाध्यक्ष मनोज मोदी, ॲड अनिल संचेती, महासचिव विजय जैन, सहसचिव प्रमोद देसरडा, कोषाध्यक्ष चैतन्य बायकोस, प्रवीण पहाडे, परेश धोका, ॲड रोशन गोलेच्छा, शिखरचंद लोहाडे, संतोष बडजाते, कांतीलाल सेठीया, नरेंद्र जोगड, दिलीप बाकलीवाल, मनोज गंगवाल, चैतन्य वायकोस, राजेश पाटणी आदींची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रशासकीय स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# पीडित कुटुंबांना मिळाला शासकीय सेवेचा आधार

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान



**जालना | प्रतिनिधी -** अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी) दाखल झालेल्या गंभीर प्रकरणांतील दिवंगत व्यक्तींच्या वारसांना शासनाने मोठा दिलासा दिला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार जालना जिल्ह्यातील अशा ८ पात्र वारसांची शैक्षणिक अर्हतेनुसार वर्ग-४ पदावर निवड करण्यात आली आहे. बुधवार दि.२५ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात या लाभार्थ्यांना नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे संघर्षानंतर या कुटुंबांना हक्काचा आधार मिळाला आहे.

जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार, सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, शासकीय वसतिगृहे आणि निवासी शाळांमधील रिक्त पदावर या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शारदा मांदळे (पहारेकरी), संगिता रंजवे (शिपाई), रमा लाटे (पहारेकरी), साईनाथ कसारे (शिपाई), साईनाथ जाधव (सफाईगार), विशाल खरात (शिपाई), दिपक जाधव (शिपाई) आणि पंकज पाटोळे (शिपाई) या आठ जणांचा समावेश आहे. आपल्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमाविल्याचे दुःख बाजूला सारून शासकीय सेवेच्या माध्यमातून सन्मानाने जगण्याची नवी उमेद या वारसांच्या चेहऱ्यावर यावेळी दिसून आली. तसेच सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून घेतलेला हा निर्णय पीडित कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे दिसून येत आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते हे नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नवनियुक्त उमेदवारांचे अभिनंदन करत त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व प्रशासकीय कामात सचोटीने योगदान देण्याचे आवाहन केले. याप्रसंगी विशेष अधिकारी स्नेहल मोदाळे, समाजकल्याण निरीक्षक अनिल सुनगत यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# वृत्तपत्र व्यवसाय हा लोकशाहीचा पाया

## व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा प्रशासनाला निवेदन

**जालना | प्रतिनिधी -** ''वृत्तपत्र उद्योग हा केवळ एक व्यवसाय नसून तो लोकशाहीचा मुख्य पाया आहे. जर आर्थिक अडचणींमुळे हा उद्योग कमकुवत झाला, तर त्याचा थेट परिणाम जनतेच्या माहितीच्या अधिकारावर होईल,'' असे प्रतिपादन व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष राजेश भालेराव यांनी केले. वृत्तपत्रांच्या प्रलंबित मागण्यांबाबत व्हॉइस ऑफ मीडियाच्या वतीने जिल्हा प्रशासनाद्वारे राज्याचे प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनातील प्रमुख मागण्या:

शासकीय जाहिरातींचे धोरण आणि वृत्तपत्रांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी निवेदनात खालील महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले आहेत:

जाहिरात दरात १५०% वाढ: सन २०१९ ते मार्च २०२६ या कालावधीत महागाई निर्देशांकानुसार जाहिरात दरांमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. त्यामुळे सर्व वृत्तपत्रांना किमान १५०% दरवाढ तातडीने मंजूर करावी.

ई-टेंडर जाहिराती पूर्ण स्वरूपात द्याव्यात: ई-टेंडर नोटिसेस संक्षिप्त स्वरूपात न देता त्या संपूर्णपणे प्रसिद्ध कराव्यात, जेणेकरून नागरिकांपर्यंत सर्व माहिती स्पष्टपणे पोहोचेल.

किमान आकार निश्चिती: जिल्हा माहिती कार्यालय व इतर शासकीय संस्थांकडून मिळणाऱ्या जाहिरातींचा किमान आकार २०० चौ. सेंमी. निश्चित करावा.

३० दिवसांत देयके अदा करावीत: शासकीय जाहिरातींचे बिल ३० दिवसांच्या आत मिळावे. विलंब झाल्यास त्यावर बँकेच्या दराने व्याज देण्यात यावे.



पेन्शन व अधिस्वीकृती नियमात शिथिलता: १० वर्षे सेवा करणाऱ्या पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका द्यावी. तसेच शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधीच्या अटी शिथिल करून, २० वर्षे सेवा व ५५ वर्षे वय पूर्ण असलेल्या पत्रकारांना पेन्शनचा लाभ द्यावा. लघु व मध्यम वृत्तपत्रांना न्याय: मोठ्या वृत्तपत्रांप्रमाणेच लघु व मध्यम वृत्तपत्रांनाही जाहिरात वाटपात समान संधी व न्याय्य वाटा मिळावा. जाहिरात वाटपावर नियंत्रण: अनेक जिल्ह्यांत शासकीय कार्यालये परस्पर जाहिराती देतात. ही पद्धत बंद करून सर्व जाहिराती माहिती खात्यामार्फतच वितरित व्हाव्यात. नैसर्गिक दरवाढ व तपासणी: २५ वर्षे पूर्ण झालेल्या वृत्तपत्रांची प्रलंबित नैसर्गिक दरवाढ तातडीने लागू करावी आणि नवीन वृत्तपत्रांच्या प्रलंबित तपासण्या त्वरित सुरू कराव्यात. व्हॉइस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष संदीप काळे व मराठवाडा उपाध्यक्ष अविनाश कव्हळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश भालेराव, जिल्हा उपाध्यक्ष नूर अहमद, कोषाध्यक्ष अशोक मिश्रा, संघटक भरत मानकर, लियाकत अली खान, भगवान साबळे, सदस्य सदानंद देशमुख, कादरी हुसेन, इलियास अब्बास, सहकोषाध्यक्ष कैलास फुलारी, सरचिटणीस रविकांत दानम यांच्यासह संघटनेचे इतर पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते.

## सीए असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर

# अध्यक्षपदी सीए स्वाती धन्नावत यांची निवड

**जालना | प्रतिनिधी -** सीए असोसिएशन जालना यांची नवीन कार्यकारणी जाहीर झाली असून या कार्यकारणीच्या अध्यक्षपदी सीए स्वाती धन्नावत, उपाध्यक्षपदी शुभम मुंदडा, सचिव पदी निलेश श्रोत्रीय तसेच कोषाध्यक्ष पदी नंदकिशोर अग्रवाल व मनाली मल्लावत यांची निवड झाली आहे. यावेळी उपस्थित सर्व सीए उमेश झंवर, निखिल बाहेती, आकाश मुंदडा, भरत अग्रवाल, पुष्कर राठी, नटवर मर्दा, दीपक रुणवाल, राज मल्लावत, संजय लखोटिया, कल्पेश लड्डा, गौरव गिंदोडिया, भाविक जैन, रितिक देवीदान, यश अग्रवाल, दर्शन जैन, समीर अग्रवाल, आतिश काबरा, पंकज गिल्डा, गोविंद गिल्डा, अतुल मंत्री इत्यादी उपस्थित होते. अध्यक्ष पद घेताना नवीन वर्षात खूप सारे नवीन उपक्रम घेण्याचे आश्वासन नवीन अध्यक्षांनी दिले जे फक्त सीए साठी नसून आम जनतेच्याही उपयोगी ठरतील.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.